या समवेत:- सोमवार दिनांक 11/03/2024 रोजी सकाळी/दुपारी 11.00 वा. प्राप्त झालेल्या अहमदनगर जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पिय सर्वसाधारण सभेचे कामकाज कार्यवृत्त जोडले आहे.

---

अहमदनगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग
क्र.साप्रवि-1/परिषद/सर्वसाधारण सभा/ १६७ /2024
अहमदनगर, दिनांक १४/०३/2024

प्रत माहितीसाठी सादर,

१. मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,अहमदनगर
२. मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,अहमदनगर
३. मा.प्रकल्प संचालक,जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा,
४. खाते प्रमुख सर्व

2/-आपल्या खात्यासंबंधी विषय व त्याबाबतचे ठरावासंबंधी, तसेच सभेमध्ये झालेल्या चर्चेत उपस्थित केलेल्या प्रत्येक मुददयावर उचित कार्यवाही करुन त्याचा अनुपालनचा लेखी अहवाल सामान्य प्रशासन विभागास त्वरीत पाठवावा,म्हणजे पुढील सर्वसाधारण सभेस अनुपालन सादर करता येईल.

(राहुल शेळके )
सचिव,सर्वसाधारण सभा तथा
उप मुख्य कार्यकारी अधिकारी,(सा.)
जिल्हा परिषद,अहमदनगर.

सर्वसाधारण सभा सोमवार दिनांक 11/03/2024 रोजी सकाळी/11.00 वा. प्राप्त झालेल्या अहमदनगर जिल्हा परिषदेच्या ,अर्थसंकल्पिय सर्वसाधारण सभेचे कामकाज कार्यवृत्त जोडले आहे.

*हजर अधिकारी*

| *अ.क्र.* | *नाव* | *अ.क्र* | *नाव* |
|---|---|---|---|
| 1 | *मा.श्री आशिष येरेकर*<br>*प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी* | 2 | मा.श्री.संभाजी लांगोरे<br>अति.मुख्य कार्यकारी अधिकारी |
| 3 | श्री.राहुल शेळके सचिव स्थायी समिती तथा,उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) | 4 | श्री.शैलेश मोरे<br>मुख्य लेखा व वित्त अधिकारी |
| 5 | श्री दादाभाऊ गुंजाळ<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी,(ग्रा.पं.) | 6 | श्री.समर्थ शेवाळे<br>प्रकल्प संचालक जलजीवन मिशन |
| 7 | श्री मनोज ससे<br>जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबाक) | 8 | श्री. पी.बी.ध्रुपद<br>प्रभारी कार्यकारी अभियंता (सा.बां.दक्षिण) |
| 9 | श्री.संजय शेवाळे<br>कार्यकारी अभियंता (सा.बां.उत्तर) | 10 | श्री.दिलीप सोनकुसळे<br>प्र.उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक (मग्रारोहयो) |
| 11 | श्री.पाडुरंग गायसमुद्रे<br>जिल्हा जलसंधारण अधिकारी (ल.पा) | 12 | श्री.श्रीरंग गडदे<br>प्र.कार्यकारी अभियंता,(ग्रा.पा.पु.) |
| 13 | श्री निलेश कानवडे<br>कृषि विकास अधिकारी | 14 | डॉ.श्री दशरथ दिघे<br>जिल्हा पशुसवंर्धन अधिकारी |
| 15 | डॉ.श्री बापूसाहेब नागरगोजे<br>जिल्हा आरोग्य अधिकारी | 16 | श्री.भास्कर पाटील<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) |
| 17 | श्री.अशोक कडूस<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक) | 18 | श्री राधाकिसन देवढे<br>प्र.जिल्हा समाज कल्याण अधिकारी |
| 19 | श्री राजु लाकुडझोडे<br>उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी | 20 | श्री. निखिल पठारे<br>प्र.उप अभियंता (भु.स.वि.यो.) |

| | |
|---|---|
| मुख्य लेखा व वित्त अधिकारी | आज दि.11/03/2024 रोजी आयोजीत जिल्हा परिषद अहमदनगर अर्थसंकल्पीय सभेत सन 2023-24 चे मुळ व अंतिम सुधारीत अंदाजपत्रक तसेच सन 2024-25 चे मूळ अंदाजपत्रक मा. प्रशासक तथा मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर श्री.आशिष येरेकर साहेब जिल्हा परिषद अहमदनगरचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक सादर करीत आहेत.<br><br>आजच्या सभेत सर्वांचे स्वागत करुन मा.प्रशासक यांना अर्थसंकल्प सादर करण्याची विनंती करतो. |
| मा.मुख्य कार्यकारी अधिकारी | आज जिल्हा परिषद अहमदनगरच्या सन2023-24 चे मुळ व अंतिम सुधारीत अंदाजपत्रक तसेच सन 2024-25 चे मूळ अंदाजपत्रक घेवून अर्थसंकल्पीय बैठकीत उपस्थित सर्व खाते प्रमुखांचे स्वागत करतो.<br><br>आपल्या सर्वांना बजेटचा गोषवारा दिलेला आहे. आजच्या अर्थसंकल्पातील ठळक वैशिष्टये, वैयक्तीक लाभाच्या योजना, खर्चाचे उद्यीष्ट इ.सन 2024-25 मध्ये वेगळया माध्यमातून विकास कामे असतील ही जिल्हा परिषदेच्या माध्यमातून कशी करायची या दृष्टीने अर्थसंकल्प सादर करीत आहे.<br><br>आपल्या समोर जो गोषवारा दिलेला आहे पान क्र.1 वर कॉलम 3 मध्ये 2023-24 चे मूळ अंदाजपत्रक ,कॉलम नं.4 मध्ये 2023-24 चे अंतिम सुधारीत अंदाजपत्रक व 2024-25 चे मूळ अंदाजपत्रक दर्शविण्यात आलेले आहे. जिल्हा परिषदेचा महसुल 385090010 दाखविला आहे तो महसुल आपल्याला रु. 417740766/- मिळालेला आहे म्हणजे मुद्रांक शुल्क वाढल्यामुळे ही वाढ आपल्याला दिसत आहे. भांडवली खर्च दाखवला आहे . विकास कामे करतांना जलजीवन मिशन मध्ये सुरक्षा अनामत ठेवली . शासन नियमानुसार ठेवली त्यामुळे त्यात वाढ दिसून येते. त्यामुळे आरंभीची शिल्लक एक कोटी आहे त्यामुळे सुधारीत अंदाजपत्रक रु. 542193808/- एवढे दिसत आहे. महसुलातून |

रु. 424169976/-इतका खर्च झालेला आहे.

सन 2024-25 चे रु. 499967100/- चे मूळ अंदाजपत्रक उद्दिष्ट आहे. अखेरची शिल्लक रु.228049/- दिसत आहे.

पान नं.2 वर जिल्हा परिषद विभागनिहाय विगतवारी दिलेली आहे.

शासनाच्या नियमानुसार ठरवून दिलेल्या विभागांना त्यांचे टक्केवारी नुसार तरतूद करण्यात आलेली आहे.

पान क्र.3 वर

1.जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये ओपन सायन्स पार्क (Open Science Park) आनंददायी शिक्षणातून विज्ञान संकल्पना राबविणे हा उद्येश आहे.

जिल्हा परिषदेच्या इयत्ता 8 वी पर्यंतच्या शाळा आहे तेथे करणार आहे. त्याकरीता जि प शाळेची जागा 5000 स्क्वेअरफुट असणे आवश्यक आहे. त्यावर 22 उपकरणे स्थापीत करायची आहेत. ग्रामपंचायतीने 10 लक्ष रु.खर्च करणे अपेक्षीत आहे. 10 लक्ष रु. जि.प.तर्फे खर्च करण्यात येणारा आहे. तसेच तेथे नरेगा मधुन काम करता येईल. ज्या ग्रामपंचायती खर्च करायला तयार आहेत अशाच 5 ग्रामपंचायतींमधील शाळांचा समावेश यामध्ये करता येईल.

सदर बाबत आराखडा व क्लीप दाखविणेत आली. यामध्ये वैज्ञानीक संकल्पना,भौतीकशास्त्र, जीवशास्त्र अवकाशाशी संबंधीत युनिट व माहिती तेथे असणार आहे. तालुक्यातील इतर शाळांच्या सहली तेथे आणता येतील असे नियोजन करणेत येणार आहे. ज्या प्रथम 5 शाळा येतील त्यांना या उपक्रमामध्ये समाविष्ट करणार आहे.

2.मिशन स्पार्क (Mission Spark) मध्ये विद्यार्थ्यांचे कौशल्य वाढविण्याकरीता थुंबा केरळ येथे विक्रम साराभाई स्पेस सेंटर / इस्त्रो /

| | |
|---|---|
| | आयआयएस /डीआरडीओ अशा प्रशिक्षण व संशोधन संस्थेस गुणवत्ताधारक विदयार्थ्यांची शैक्षणिक सहल आयोजीत करणे यामध्ये आपल्या आसपास सुध्दा ब-याच संशोधन संस्था आहेत तेथे विदयार्थ्यांच्या सहली नेता येतील.<br><br>3.मिशन आरंभ - इयत्ता 5 वी व 8 वी च्या मुलांकरीता शिष्यवृत्ती परीक्षा शासन स्तरावरुन घेणेत येते. त्याच धरतीवर अहमदनगर जिल्हयातील जिल्हा परिषद शाळेच्या इयत्ता चौथी व सातवी च्या विद्यार्थ्यांची जिल्हा परिषद मार्फत परीक्षा घेणेत आली. त्यापैकी 1000 मुलांना शिष्यवृत्ती परीक्षेच्या पुर्वतयारीची पुस्तीका पुरवणे, अतिरिक्त तास घेवून शिकविणे, ऑनलाईन प्रशिक्षण देणे त्यांचेकडून सराव प्रश्नसंच पुस्तिका सोडवून घेणे इ.करीता शिक्षण विभाग (प्राथ.) ला अनुदान दिलेले आहे. शिष्यवृत्ती परीक्षेची रंगीत तालीम ओळखपत्र (हॉल तिकीट) सह घेणेत येत आहे. त्याकरीता निधी देणेत आलेला आहे.<br><br>4.मधाचे गांव – खादी ग्रामोद्योग विभागामार्फत सदर योजना राबविणेत येत आहे. अहमदनगर जिल्हयातील अकोले तालुक्यातील उंचखडक सारख्या ठिकाणी मध गोळा करण्याचे काम चालू आहे. शासनाकडून 50 लक्ष रु.मिळतील व काही जिल्हा परिषदेकडून मदत करुन गावाचे नाव मधामध्ये ब्रॅण्ड व्हावे त्याकरीता प्रयत्न करणेत येणार आहे.<br><br>5.सुरभी सुरक्षा अभियान - अहमदनगर जिल्हयात प्रगत पशुपालक आहेत . जिल्हयात गायी-म्हशींची संख्या जवळपास 16 लक्ष पर्यंत आहे. जिल्हा दुध उत्पादनात अग्रेसर आहे. पशुखादयाच्या स्वरुपात सरकी / पेंड /वैरण इ.चा वापर होतो. टोमॅटो / डाळींब बागेतील चा-यामध्ये तार / खिळा/ लोखंडी वस्तु चा-यासोबत जनावरांच्या पोटात जाण्याची दाट शक्यता असते. अशा वस्तु जनावरांच्या पोटात गेल्यानंतर बाहेर पडत नाहीत ते जनावराच्या पोटात साठते. त्यामुळे जनावरे आजारी पडतात. परिणामी दुध उत्पादन घटते त्याच वस्तु जर जनावराच्या हृदयापर्यंत |

गेल्या तर जनावरं दगावण्याची शक्यता असते. जवळ-जवळ 80 टक्के शस्त्रक्रिया या अपचनीय वस्तु (खिळा/तार इ.) जनावराच्या पोटात गेल्यामुळे होतात.त्याकरीता गायी-म्हशींच्या पोटातील लोहजन्य वस्तुपासून प्रतिबंध व उपायाकरीता साहित्य व उपकरणे पुरविणे (Cow Magnet/Gun) ही योजना घेतली. जनावरांच्या पोटातील अपचनीय वस्तु या मॅग्नेटमुळे तेथेच राहतील जनावरांच्या शरिरात इतरत्र जाणार नाहीत. आणि ऑपरेशनची वेळ आलीच तर वस्तु काढल्यानंतर जनावरं पुर्ववत (recover) होवू शकतात. जर जनावरं लवकर पुर्ववत झाले नाही तर दुधाचे नुकसान होते त्यामुळे Cow Magnet चा वापर केला तर शेतक-याचे नुकसान टळू शकते. या मॅग्नेटची किंमत अंदाजे 400 ते 1000 रु पर्यंत आहे. गन वापरुन ते जनावराच्या पोटात सोडले जाईल. प्रशिक्षीत कर्मचारी ते व्यवस्थित सोडू शकतात. Cow Magnet जनावरांना लाईफ-टाईम प्रोटेक्शन देवू शकेल. जनावरांना खिळा / तार पोटात गेले तरी इजा होणार नाही व या मॅग्नेटचे साईड इफेक्ट नाहीत. योजना कशा पध्दतीने राबवायची याबाबत प्रचार / प्रसिध्दी करणेत येईल. सध्या 10 लक्ष रु.ची तरतुद करणेत आलेली आहे.

6.वाचन प्रेरणा – जिल्हा परिषद मध्ये जे ग्रंथालय आहे त्यामध्ये पुस्तके/ मासिके/ दैनिके याकरीता 1.00 लक्ष रु.ची तरतुद करणेत आलेली आहे.

7. QR based Attendance System - याकरीता 6.00 लक्ष रु ठेवणेत आलेले असुन यामध्ये उपस्थिती बाबत जिल्हा परिषद अधिनस्त सर्व कर्मचारी / अधिकारी उदा.शिक्षक , ग्रामसेवक, ग्राम विकास अधिकारी अंगणवाडी पर्यवेक्षीका , प्रा.आ.केंद्र / उपकेंद्र मधील डॉक्टर व सर्व स्टाफचा सर्वांचा समावेश होईल. अधिकारी / कर्मचारी यांचेमध्ये शिस्तबध्दता आणण्याकरीता या पध्दतीचा वापर होईल. सदर योजना 3 महिन्यामध्ये सुरु होईल.

8.मिशन पंचसुत्री पुरस्कार – ग्रामपंचायतींना 5 प्राधान्यक्रम ठरवून दिलेले आहेत. वित्त आयोग व स्वनिधी – प्राप्त निधीमधुन 1) शाळा निट

| | |
|---|---|
| | करणे ,स्वच्छतागृह बांधणे,वॉलकंपाऊंड करणे, 2) अंगणवाडी चांगली पाहीजे. 3) महिला बचत गटाच्या मालाला विक्रि केंद्र उपलब्ध करुन दिले पाहीजे. 4) स्वच्छता अभियान अंतर्गत कचरा संकलनाकरीता घरोघरी डस्टबीन देणे व कचरा वर्गीकरण करुन त्याची योग्य विल्हेवाट लावणे 5) वृक्षारोपण करणे इ.करीता राज्यस्तरावरुन पुरस्कार दिले जातात त्यालाच पंचसुत्री नाव दिले आहे. आता त्याकरीता जिल्हा स्तरावरुन जिल्हयातील तीन ग्राम पंचायतीची निवड होवून प्रथम बक्षीस 7 लक्ष रु. व्दितीय बक्षिस -5 लक्ष रु व तृतीय बक्षिस 3 लक्ष रु. देणे बाबत 2024-25 या वर्षापासून तरतुद करण्यात आलेली आहे.<br><br>9.हर्बल गार्डन – प्रा आ केंद्र / उपकेंद्र मध्ये हर्बल / आयुष गार्डन विकसीत करण्याकरीता 5.00 लक्ष रु.ची तरतूद करण्यात आलेली आहे. स्मार्ट प्रा आ केंद्र मध्ये औषधी वनस्पतींची लागवड करण्यात येणार आहे. त्याबद्दल जन-जागृती सुध्दा होईल. तसेच प्रा.आ. केंद्राचे सुशोभिकरण सुध्दा होईल.<br><br>10.प्रा. आ. केंद्र /उपकेंद्र इमारतीवर सौर उर्जा प्रणाली स्थापित करणे – याकरीता 5.00 लक्ष रु तरतूद करण्यात आलेली आहे. काही वर्षापूर्वी सौर उर्जा प्रकल्प घेतले होते ते काही चालू आहेत काही बंद आहेत जे बंद आहेत ते दुरुस्त करुन चालू करणेत येतील व जेथे नाहीत तेथे नवीन घेणेत येतील. प्राथमिक आरोग्य केंद्रात महिलांची डिलीव्हरी झाल्यानंतर गरम पाण्याची सोय आवश्यक असते. त्याकरीता सौर ऊर्जा आवश्यक आहे.<br><br>11.एकुलती एक लाडकी लेक – या नाविण्यपूर्ण योजने अंतर्गत एका मुलीवर शस्त्रक्रिया करणा-या जोडप्यास रु.20000/- जिल्हा परिषद मार्फत देणेची योजना आहे. शासनाकडून दोन मुलींसाठीची योजना आहे. मागील वर्षी 5 प्रस्ताव प्राप्त झाले. आता एका मुलीवर सुध्दा शस्त्रक्रिया करायला तयार असलेले जोडपे आहेत. त्यामुळे यावर्षी सदर |

| | |
|---|---|
| | योजनेकरीता 5.00 लक्ष रु.अनुदान ठेवणेत आलेले आहे.<br><br>12.रस्ते व दळण-वळण करीता 4.60 कोटी रु ठेवणेत आलेले आहेत. रस्त्यांकरीता नियोजन मधुन व शासन स्तरावरुन सुध्दा निधी उपलब्ध होतो.<br><br>13.जलधारा –जलसंधारणाच्या कामांच्या देखभाल दुरुस्तीसाठी 1.00 कोटी रु अनुदान ठेवणेत आले आहेत.<br><br>14.जमिनभाडे - जिल्हा परिषद मार्फत तयार केलेले 7 बीओटी (बांधा वापरा हस्तांतरीत करा) चे प्रस्ताव शासन स्तरावर अंतीम टप्प्यात आहेत. लोणी येथील शाळेच्या बीओटी तत्वावरील शॉपींग सेंटरचे काम चांगले झाले असुन त्याचे उद्धाटन नुकतेच झाले आहे. त्यावेळी मा.सचिव महोदय यांना 7 बीओटी प्रस्तावांचे पीपीटी दाखविणेत आले. त्यांनी सकारात्मक भूमिका दाखविली आहे. इतर ठिकाणी जागा आहेत तेथे जाहिरात फलक लावणेकरीता प्रयत्न करणार आहे व त्यातुन जिल्हा परिषदेला उत्पन्न मिळू शकेल. जिल्हा परिषदच्या बाहेरच्या बाजूला असे बोर्ड बनवले तर चांगले उत्पन्न मिळू शकेल. त्याकरीता प्रयत्न करणार आहे.अशा प्रकारे अर्थसंकल्पामध्ये ठळक वैशिष्टयपूर्ण योजना घेणेचा प्रयत्न करणेत आला आहे. |
| मा.मुख्य कार्यकारी अधिकारी | वैयक्तिक लाभाच्या योजना<br><br>1.समाजकल्याण व कृषी विभागामार्फत ग्रामीण भागातील शेतक-यांना कडबाकुट्टी यंत्र पुरविणे याकरीता 600 लाभार्थ्यांची निवड करुन 100.00 लक्ष रु अनुदान ठेवणेत आले आहे.<br><br>2.इयत्ता 5 वी ते 10 पर्यंतच्या शिक्षण घेत असलेल्या मुलींना मोफत सायकल पुरविणे योजने अंतर्गत समाजकल्याण व महिला बालकल्याण विभागामार्फत सुमारे 1250 लाभार्थ्यांना 75.00 लक्ष रु तरतूद आहे.<br><br>3.मागासवर्गीय व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य पुरविणे |

| | |
|---|---|
| | याकरीता 65.00 लक्ष रु. अंदाजे 500 लाभार्थ्यांना फायदा होईल या दृष्टीने योजना घेणेत आलेली आहे.<br><br>4.दिव्यांग व्यक्तींना घरकुल - मागील वर्षी ही योजना नव्याने घेणेत आली . 48 लक्ष रु तरतूद करणेत आलेली आहे. जिल्हयात ड यादी मोठी आहे त्यामुळे दिव्यांगाचा नंबर येण्यास वेळ लागतो. त्यामुळे योजनेमधून दिव्यांगांना प्राधान्य देवून अनुदान देणेत येते. अंदाजे 40 लाभार्थ्यांना फायदा होईल.<br><br>5.मागासवर्गीय महिलांना शिलाई मशिन पुरविणे याकरीता 45.00 लक्ष अनुदान ठेवणेत आलेले आहे.<br><br>6.ग्रामीण भागातील महिलांना व मुलींना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देणे याकरीता 35.00 लक्ष रु.अनुदान ठेवणेत आले आहे.<br><br>7.जिल्हयात पशुपालकांना दुध काढणी यंत्राचा 60 टक्के अनुदानावर पुरवठा करणे – 20.00 लक्ष अनुदान ठेवणेत आले असुन त्यामध्ये 133 लाभार्थ्यांना लाभ होईल.<br><br>8.जिल्हयातील पशुपालकांना पशुधनाकरीता मुक्तसंचार गोठा तयार करण्याकरीता प्रोत्साहनपर अनुदान देणेकरीता 15.00 लक्ष रु. तरतूद करण्यात आलेली आहे.<br><br>अशा पध्दतीने एकंदर सन 2024-25 चे मूळ अंदाजपत्रक विभाग निहाय तरतुदी व अर्थसंकल्पातील तरतुदी ठळक वैशिष्टये यांचे वाचन करणेत आले. |

**विषय क्रं.१ :-** दिनांक 26/02/2024 रोजीची सर्वसाधारण सभा पुर्ण झालेल्या सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.

**<u>ठराव क्रंमाक १५७:-</u>** दिनांक 26/02/2024 रोजी सकाळी 11.00 वाजता पुर्ण झालेल्या सभेचे इतिवृत्त कायम करणे व मंजुर ठरावावर संबंधित खात्याने केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणेत येऊन त्यावार महत्वाचे कार्यवाहीच्या मुद्दयावर संबधित विभागाने केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेऊन त्यांची नोंद घेणेत आली.संबधित सर्व खातेप्रमुखांनी सभेतील कामकाजानुसार तातडीने उचित कार्यवाही करुन अनुपालन सादर करावे.

**<u>विषय क्रं २</u>**:- अहमदनगर जिल्हा परिषदेचे सन 2024-25 कार्यक्रम अंदाजपत्रक सादर करणेबाबत.

प्रस्तावना :-अहमदनगर जिल्हा परिषदेचे कार्यक्रम अंदाजपत्रक प्रत्येक वर्षी दि.27 मार्च पुर्वी होणाऱ्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेमध्ये जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचे वेळीच आकलन व्हावे या उद्देशाने अर्थ संकल्पावर होणाऱ्या चर्चेच्या वेळी कार्यक्रम अंदाजपत्रक वितरीत करणे आवश्यक आहे. त्याकरीता खातेप्रमुखांनी तयार केलेले कार्यक्रम अंदाजपत्रक एकत्रितरित्या मा. प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर यांचेसमोर सादर करण्यात येत आहे.

नियमातील तरतुदी :-

ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय मंुबई याचेकडील पत्र क्रमांक जिकाअ -2002/ प्र.क्र. 227 / वित्त-5 ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मंुबई 400032 दि. 31 डिसेंबर 2003 व ग्रामविकास विभागाकडील आदेश दि. 13/09/2022 अन्वये अन्वये जिल्हा परिषदेचे कार्यक्रम अंदाजपत्रक अर्थ संकल्पावर होणाऱ्या चर्चेच्या वेळी वितरीत करणे आवश्यक आहे.

विभागाचे अभिप्राय :-

खाते प्रमुखांनी तयार केलेले सन 2024-25 चे कार्यक्रम अंदाजपत्रक एकत्रितरित्या मा. प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर यांचेसमोर सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रंमाक१५८-** अहमदनगर जिल्हा परिषद सन 2023-24 चे कार्यक्रम अंदाजपत्रक मा.जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यात येत आहे. कार्यक्रम अंदाजपत्रकावर मा. जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेमध्ये होणाऱ्या चर्चेच्या वेळी जिल्हा परिषदेच्या योजनांबाबत सर्व माननीय सदस्यांना अवगत होणेकरीता सन 2023-24 चे कार्यक्रम अंदाजपत्रक पुस्तक रुपाने सादर केले आहे. त्याअनुषंगाने महाराष्ट्र शासन राजपत्र ग्रामविकास विभाग बांधकाम भवन, मर्झबन पथ फोर्ट मुंबई - 400 001 दि. 13 सप्टेंबर 2022 अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जिल्हा परिषदेचे अधिकार देण्यात आलेले आहे. त्यानुसार मा. प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर यांचे अध्यक्षेतेखाली झालेल्या सर्वसाधारण सभेत कार्यक्रम अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येत आहे.

**विषय क्रंमाक ३:-** अहमदनगर जिल्हा परिषदेचे स्वत: चे उत्पन्नाचे सन 2023-24 चे अंतिम सुधारित तसेच सन 2024-25 मूळ अंदाजपत्रक जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेपुढे मंजूरीस्तव सादर करणेबाबत.

प्रस्तावना :-

अहमदनगर जिल्हा परिषदेचे स्वत: चे उत्पन्नाचे अंदाजपत्रकास प्रत्येक वर्षी दि. 27 मार्च पुर्वी मान्यता घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे जिल्हा परिषदेचे उपरोक्त विषयात नमूद केले प्रमाणे अंदाजपत्रकास मान्यता घेणे करीता जिल्हा परिषदेचे स्वत:चे उत्पन्नाचे सन सन 2023-24 चे अंतिम सुधारित तसेच सन 2024-25 मूळ अंदाजपत्रक तयार करुन मा. प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर यांचेसमोर मान्यता घेणेकरीता पुस्तक रुपाने सादर करण्यात येत आहे.

नियमातील तरतुदी :-

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 137 व 138 आणि अर्थ संकल्पिय नियम 1966 चे कलम 9 नूसार व ग्रामविकास विभागाकडील आदेश दि. 13/09/2022

अन्वये दि. 27 मार्च पुर्वी जिल्हा परिषद सर्व साधारण सभेसमोर अंदाजपत्रक मंजूरी घेणेबाबतची तरतूद आहे.

**विभागाचे अभिप्राय :-**

सर्व विभाग प्रमुखांनी सादर केलेले अंदाजपत्रकीय मागण्याची छाननी करुन आणि उत्पन्नाच्या स्त्रोतांचा विचार करुन अंदाजपत्रकीय तरतूदी करण्यात आलेल्या असून त्या पुस्तक रुपात मा. प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर यांचेकडेस मंजूरीस्तव सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रंमाक१५९:-** अहमदनगर जिल्हा परिषदेचे स्वत: चे उत्पन्नाचे अंदाजपत्रकास

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (अर्थसंकल्पीय अंदाज) 1966 चे कलम 9 नियम 137 (3) (4) अन्वये प्रत्येक वर्षी दि.27 मार्च पुर्वी मान्यता घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे जिल्हा परिषदेचे उपरोक्त विषयात नमूद केले प्रमाणे अंदाजपत्रकास मान्यता घेणे करीता जिल्हा परिषदेचे स्वत:चे उत्पन्नाचे सन  सन 2023-24 चे अंतिम सुधारित तसेच  सन 2024-25 मूळ अंदाजपत्रक तयार करुन ते जिल्हा परिषदेचे सर्वसाधारण सभेची मान्यता घेणेकरीता पुस्तक रुपाने सादर करण्यात येत आहे.

अंदाजपत्रकातील विभागांना दिलेल्या तरतूदी खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | तपशिल | सन 2023-24 चे मुळ अंदाजपत्रक | सन 2023-24 चे अंतिम सुधारित अंदाजपत्रक | सन 2024-25 चे मुळ अंदाजपत्रक |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | | | |
| 1 | अ - प्रशासन विभाग (2053) | 12963000 | 2946000 | 13464000 |
| 2 | सामान्य प्रशासन विभाग (2053) | 9381000 | 16548000 | 10255000 |
| 3 | शिक्षण विभाग (2202) | 11910000 | 14157850 | 20111000 |
| 4 | इमारत व दळणवळण (उत्तर) -(2059) (3054) | 42810000 | 40860000 | 39513000 |
| 5 | इमारत व दळणवळण (दक्षिण) - (2059) (3054) | 67570000 | 71620000 | 64581000 |
| 6 | लघु पाटबंधारे विभाग (2702) | 10600000 | 10600000 | 11001000 |
| 7 | ग्रामीण पाणी पुरवठा / देखभाल व दुरुस्ती | 33000000 | 33991400 | 24000000 |
| 8 | ग्रामीण पाणी पुरवठा विभाग (2215) | 2000 | 2000 | 3000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 9 | सार्वजनिक आरोग्य विभाग (2210) | 7702000 | 7702000 | 8503000 |
| 10 | कृषी विभाग (2401) | 8067000 | 9567000 | 7767000 |
| 11 | पशुसंवर्धन विभाग (2403) | 12907000 | 14407000 | 13001000 |
| 12 | समाजकल्याण विभाग (2225)(2235) | 25200000 | 30561364 | 24906000 |
| 13 | दिव्यांग कल्याण विभाग (2225)(2235) | 6000000 | 6247850 | 6001000 |
| 14 | समाज विकास (सर्व पंचायत समिती) | 19368010 | 16559812 | 20188317 |
| 15 | महिला व बाल कल्याण विभाग (2235) | 12000000 | 12495700 | 12006000 |
| 16 | ग्रामपंचायत विभाग (2053) | 88602000 | 117352000 | 88003000 |
| 17 | अर्थ विभाग (2053) | 11301000 | 8551000 | 13106683 |
| 18 | संकिर्ण (व्यपगत व भरती प्रक्रिया) | 12000000 | 10001000 | 10001000 |
| श् | एकूण महसूल खर्च | 391383010 | 424169976 | 386411000 |
| 17 | भांडवल | 84853100 | 113507100 | 113556100 |
| 18 | महसूल + भांडवल | 476236110 | 537677076 | 499967100 |
| 19 | अखेरची शिल्लक | 4652942 | 4516732 | 228049 |
| श् | अखेरच्या शिलकेसह एकंदर एकूणांत | 480889052 | 542193808 | 500195149 |

सर्व विभाग प्रमुखांनी सादर केलेले अंदाजपत्रकीय मागण्याची छाननी करुन आणि उत्पन्नाच्या स्त्रोतांचा विचार करुन अंदाजपत्रकीय तरतूदी करण्यात आलेल्या असून त्यानुसार विभाग प्रमुखांनी उचित कार्यवाही करावी व अंदाजपत्रकाच्या मर्यादेतच खर्च करणेबाबत सभेत सुचणा देण्यात आल्या आहे.

त्याअनुषंगाने महाराष्ट्र शासन राजपत्र ग्रामविकास विभाग बांधकाम भवन, मर्झबन पथ फोर्ट मंुबई - 400 001 दि. 13 मार्च 2022 अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जिल्हा परिषदेचे अधिकार देण्यात आलेले आहे. त्यानुसार मा. प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर यांचे अध्यक्षेतेखाली झालेल्या सर्वसाधारण सभेत अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येत आहे.

**विषय क्रंमाक ४:-** रुपांतरीत साठवण तलावाची कामे हाती घेण्यासाठी जिल्हा परिषद विभागाच्या आखत्यारीत असलेल्या पाझर तलावाचे कामांसाठी ना-हरकत मिळणे बाबत.

**प्रस्तावना :-उपरोक्त** संदर्भिय विषयान्वये संगमनेर, कोपरगाव व राहाता तालुक्यातील पाझर तलावांचे साठवण तलावांमध्ये रुपांतरीत करण्याची कामे मृद व जलसंधारण विभाग अहमदनगर यांच्या मार्फ़त प्रस्तावित करण्यात आली आहे. तथापी सदर पाझर तलाव जिल्हा परिषद विभागाचे अखत्यारीत असलेने उपरोक्त संदर्भ क्र. 1 मधील शासन परिपत्रकानुसार

पाझर तलावांचे साठवण तलावांमध्ये रुपांतरीत करण्याकरिता ना-हरकत प्रमाणपत्र मिळणे बाबत उपरोक्त संदर्भ क्र. 2 व 8 अन्वये जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग अहमदनगर यांनी इकडे कळविले आहे.

उपरोक्त संदर्भ क्र. 2 मधील नमुद जि.प. पाझर तलावांचे रुपांतर साठवण तलावात करणे व दुरुस्तीचे काम मृद व जलसंधारण विभागा मार्फ़त करणेबाबत नाहरकत देणेसाठी शासन परिपत्रकातील अटी/ मार्गदर्शक सुचनानुसार उपविभागीय जलसंधारण अधिकारी जि.प.ल.पा. उपविभाग कोपरगाव यांचा मुद्दे निहाय स्वयंस्पष्ट अहवाल व परिपुर्ण प्रस्ताव उपरोक्त संदर्भ क्र. 3 अन्वये इकडे सादर करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

उपविभागीय जलसंधारण अधिकारी जि.प.ल.पा. उपविभाग कोपरगाव यांनी सदर तलावांची पाहणी केलेली आहे. सदर पाझर तलावांमध्ये पाणीसाठा वाढणेसाठी दुरुस्तीची गरज आहे. दुरुस्ती झाल्यास सदर तलावामधील पाणीसाठा वाढुन आजुबाजुच्या जमिनीतील पाण्याची पातळी वाढुन सिंचनासाठी व पिण्याच्या पाण्याच्या विहिरिंना फ़ायदा होऊ शकतो. तसेच पाझर तलाव वेस, पा.त. कालेवाडी तसेच पा.त. पिंप्री लोकाई हे मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेत प्रस्तावित केलेले आहे. तरी उपरोक्त संदर्भ क्र. 1 मधील मार्गदर्शक सुचनांचे पालन करुन पाझर तलावांचे रुपांतरण साठवण तलावात करण्यास व दुरुस्ती काम मृद व जलसंधारण विभागामार्फ़त करनेस हरकत नाही असे उपविभागीय जलसंधारण अधिकारी यांनी उपरोक्त संदर्भ क्र. 4 अन्वये इकडे कळविलेले आहे.

जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसं. विभाग अहमदनगर यांच्याकडे उपविभागागीय जलसं. अधिकारी मृ. व जलसंधारण उपविभागाकडून **पाझर तलाव वेस ता. कोपरगाव, पा.त. पिंप्री लोकाई व पा.त. को-हाळे (कालेवाडी) ता. राहाता तसेच पा.त. खांबे (नेहरवाडी) व पा.त. चंदनापुरी (तांबकडा) ता. संगमनेर** या तलावांचे रुपांतरण साठवण तलावामध्ये करण्याकरिता प्रस्ताव प्राप्त झालेले आहे. उक्त प्रस्तावांसोबत ग्राम पंचायतीच्या ग्रामसभेचा मासिक ठराव सादर करण्यात आले आहे. त्यामध्ये उक्त तलावामधुन मोठ्या प्रमाणावर गळती होत असल्याने सदर पाझर तलावांचे रुपांतर साठवण तलावामध्ये करण्याबाबत आग्रही मागणी केलेली आहे. त्यानुसार स्थानिक लोक प्रतिनिधी यांनी पाझर तलावांचे रुपांतर साठवण तलावामध्ये करण्याबाबत आग्रही मागणी केलेली आहे.

सदर तलावांना उपविभागीय जलसं. अधिकारी यांनी भेट दिली असता, सदर तलावाच्या खंदकामधुन व भरावामधुन मोठ्या प्रमाणावर गळती होत असल्याने सदर तलावामध्ये संकल्पीत पाणीसाठा होत नसल्याचे आढळुन आले. सदर तलावाचे रुपांतर साठवण तलावामध्ये केल्यास सदर तलावामध्ये पुर्ण संकल्पीत संचय क्षमतेने पाणीसाठा होउन सदर पाणी शेतक-यांना सिंचना करिता व जनावरांच्या पिण्याच्या पाण्याकरीता वापरता येईल व शेतक-यांसाठी शाश्वत सिंचनाचि सोय होण्यास मदत होइल. त्या करिता सदर तलवाच्या संकल्पनामध्ये आवश्यक तांत्रिक बदल करण्यासाठी मा. जिल्हा जलसंधारण अधिकारी जि.प.ल.पा. विभाग अहमदनगर यांचे नाहरकत घेणे आवश्यक असल्याचे उपविभागीय जलसं. अधिकारी मृ व जलसं. उपविभाग कोपरगाव यांनी कळविलेले आहे. त्या अनुषंगाणे उक्त प्रस्ताव सक्षम स्तरावरून **ना हरकत प्रमाणपत्र** मिळणेकरिता जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसं. विभाग अहमदनगर यांनी उपरोक्त संदर्भ क्र. 5 अन्वये पुढील कार्यवाहीस्तव इकडे पाठविलेले आहे. उक्त प्रस्तावासोबत पाझर तलावांचे ठळक वैशिष्टये, स्थानिक लोकप्रतिनीधी यांचे पत्र, ग्राम पंचायत यांचेकडील पत्र/ ठराव यांची छायांकित प्रती व उक्त तलावाचे छायाचित्र सादर केलेले आहे.

**नियमातील तरतूदी -**

१. महाराष्ट्र शासन मृद व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-2022/ प्र.क्र. 101/ जल-1, दि. 13.04.2022.

**विभागाचा अभिप्राय -**

उपरोक्त प्रस्तावांचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते कि, **पाझर तलाव वेस ता. कोपरगाव, पा. त. को-हाळे (कालेवाडी), पा.त. पिंपरी लोकाई ता. राहाता तसेच पा.त. खांबे (नेहरवाडी) व पा.त. चंदनापुरी (तांबकडा) ता. संगमनेर** येथील ग्रामपंचायतीने उक्त तलावामधुन मोठ्या प्रमाणावर गळती होत असल्याने सदर पाझर तलावांचे रुपांतर साठवण तलावामध्ये करण्याबाबत आग्रही मागणी केलेली आहे. तसेच स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी पाझर तलावांचे रुपांतर साठवण तलावामध्ये करण्याबाबत आग्रही मागणी केलेली आहे. त्यानुसार सदर तलावाच्या खंदकामधुन व भरावामधुन मोठ्या प्रमाणावर गळती होत असल्याचे आढळुन आले व त्यामुळे सदर तलावामध्ये संकल्पीत पाणीसाठा होत

नसल्याचे आढळुन आले. सदर तलावाचे रुपांतर साठवण तलावामध्ये केल्यास सदर तलावामध्ये पुर्ण संकल्पीत संचय क्षमतेने पाणीसाठा होउन सदर पाणी शेतक-यांना सिंचना करिता व जनावरांच्या पिण्याच्या पाण्याकरीता वापरता येईल व शेतक-यांसाठी शाश्वत सिंचनाची सोय होण्यास मदत होइल असे जिल्हा जलसंधारण अधिकारी मृवज. विभाग अहमदनगर यांनी कळविलेले आहे.

त्या अनुसार **पाझर तलाव वेस ता. कोपरगाव, पा. त. को-हाळे (कालेवाडी) व पा.त. पिंपरी लोकाई ता. राहाता तसेच पा.त. खांबे (नेहरवाडी) व पा.त. चंदनापुरी (तांबकडा) ता. संगमनेर** या जि.प. पाझर तलावांचे रुपांतर साठवण तलावात करण्यास व दुरुस्ती काम मृद व जलसंधारण विभागामार्फ़त केल्याने सदर तलावामध्ये दिर्घ कालावधीसाठी पुर्ण संकल्पीत संचय क्षमतेने पाणीसाठा होउन शेतक-यांना फ़ायदा होणार आहे.

तरी महाराष्ट्र शासन मृद व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र. संकिर्ण- 2022/ प्र.क्र.101/ जल-1, दि. 13.04.2022 अन्वये पाझर तलावाचे रुपांतर साठवण तलावात करण्यापुर्वी विचारात घ्यावयाच्या 1 ते 18 मार्गदर्शक सुचना देण्यात आलेल्या आहेत. सदर सुचनांचे अनुपालन व पुर्तता मृद व जलसंधारण विभाग अहमदनगर यांनी करण्याच्या अटींच्या अधिन राहुन **पाझर तलाव वेस ता. कोपरगाव, पा. त. को-हाळे (कालेवाडी) व पा.त. पिंपरी लोकाई ता. राहाता तसेच पा.त. खांबे (नेहरवाडी) व पा.त. चंदनापुरी (तांबकडा) ता. संगमनेर** या जि.प. पाझर तलावाचे रुपांतर मृद व जलसंधारण विभागामार्फ़त साठवण तलावामध्ये करण्याच्या कामांना जि.प. सर्वसाधारण सभेची मान्यता घेवुन ना हरकत देण्यात यावी असे इकडील मत आहे. त्या अनुषंगाने सदरचे प्रस्ताव जि. प. सर्वसाधारण सभेत मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

तसेच उपरोक्त विषयान्वये उक्त शासन परिपत्रकातील सुचनांचे अनुपालन व पुर्तता मृद व जलसंधारण विभाग अहमदनगर यांनी करण्याच्या अटींच्या अधिन राहुन **पाझर तलाव एरंडोली, ता. श्रीगोंदा** या जि.प. पाझर तलावाचे रुपांतरण मृद व जलसंधारण विभागामार्फ़त साठवण तलावामध्ये करण्याच्या कामाला मा. मु.का.अ. जि.प. अहमदनगर यांचेकडील मंजुर टिपणीदि. 29.01.2024 नुसार या विभागाकडील पत्र जा.क्र. कार्या 1/ रेशा 1/ 49/ 2024, दि.

29.01.2024 अन्वये ना हरकत देण्यात आलेली आहे. तरी सदर कामाला जि.प. सर्वसाधारण सभेची कार्योत्तर मान्यता मिळण्यास सविनय सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक १६०:-** उपरोक्त संदर्भिय विषयान्वये संगमनेर, कोपरगाव व राहाता तालुक्यातील पाझर तलावांचे साठवण तलावांमध्ये रुपांतरीत करण्याची कामे मृद व जलसंधारण विभाग अहमदनगर यांच्या मार्फ़त प्रस्तावित करण्यात आली आहे. तथापी सदर पाझर तलाव जिल्हा परिषद विभागाचे अखत्यारीत असलेने उपरोक्त संदर्भ क्र. 1 मधील शासन परिपत्रकानुसार पाझर तलावांचे साठवण तलावांमध्ये रुपांतरीत करण्याकरिता ना-हरकत प्रमाणपत्र मिळणे बाबत उपरोक्त संदर्भ क्र. 2 व 8 अन्वये जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग अहमदनगर यांनी इकडे कळविले आहे.

उपरोक्त संदर्भ क्र. 2 मधील नमुद जि.प. पाझर तलावांचे रुपांतर साठवण तलावात करणे व दुरुस्तीचे काम मृद व जलसंधारण विभागा मार्फ़त करणेबाबत नाहरकत देणेसाठी शासन परिपत्रकातील अटी/ मार्गदर्शक सुचनानुसार उपविभागीय जलसंधारण अधिकारी जि.प.ल.पा. उपविभाग कोपरगाव यांचा मुद्दे निहाय स्वयंस्पष्ट अहवाल व परिपुर्ण प्रस्ताव उपरोक्त संदर्भ क्र. 3 अन्वये इकडे सादर करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

उपविभागीय जलसंधारण अधिकारी जि.प.ल.पा. उपविभाग कोपरगाव यांनी सदर तलावांची पाहणी केलेली आहे. सदर पाझर तलावांमध्ये पाणीसाठा वाढणेसाठी दुरुस्तीची गरज आहे. दुरुस्ती झाल्यास सदर तलावामधील पाणीसाठा वाढुन आजुबाजुच्या जमिनीतील पाण्याची पातळी वाढुन सिंचनासाठी व पिण्याच्या पाण्याच्या विहिरिंना फ़ायदा होऊ शकतो. तसेच पाझर तलाव वेस, पा.त. कालेवाडी तसेच पा.त. पिंप्री लोकाई हे मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेत प्रस्तावित केलेले आहे. तरी उपरोक्त संदर्भ क्र. 1 मधील मार्गदर्शक सुचनांचे पालन करुन पाझर तलावांचे रुपांतरण साठवण तलावात करण्यास व दुरुस्ती काम मृद व जलसंधारण विभागामार्फ़त करनेस हरकत नाही असे उपविभागीय जलसंधारण अधिकारी यांनी उपरोक्त संदर्भ क्र. 4 अन्वये इकडे कळविलेले आहे.

जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसं. विभाग अहमदनगर यांच्याकडे उपविभागागीय जलसं. अधिकारी मृ. व जलसंधारण उपविभागांकडून **पाझर तलाव वेस ता. कोपरगाव, पा.त. पिंप्री लोकाई व पा.त. को-हाळे (कालेवाडी) ता. राहाता तसेच पा.त.**

**खांबे (नेहरवाडी) व पा.त. चंदनापुरी (तांबकडा) ता. संगमनेर** या तलावांचे रुपांतरण साठवण तलावामध्ये करण्याकरिता प्रस्ताव प्राप्त झालेले आहे. उक्त प्रस्तावांसोबत ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेचा मासिक ठराव सादर करण्यात आले आहे. त्यामध्ये उक्त तलावामधुन मोठ्या प्रमाणावर गळती होत असल्याने सदर पाझर तलावांचे रुपांतर साठवण तलावामध्ये करण्याबाबत आग्रही मागणी केलेली आहे. त्यानुसार स्थानिक लोक प्रतिनिधी यांनी पाझर तलावांचे रुपांतर साठवण तलावामध्ये करण्याबाबत आग्रही मागणी केलेली आहे.

सदर तलावांना उपविभागीय जलसं. अधिकारी यांनी भेट दिली असता, सदर तलावाच्या खंदकामधुन व भरावामधुन मोठ्या प्रमाणावर गळती होत असल्याने सदर तलावामध्ये संकल्पीत पाणीसाठा होत नसल्याचे आढळुन आले. सदर तलावाचे रुपांतर साठवण तलावामध्ये केल्यास सदर तलावामध्ये पुर्ण संकल्पीत संचय क्षमतेने पाणीसाठा होउन सदर पाणी शेतक-यांना सिंचना करिता व जनावरांच्या पिण्याच्या पाण्याकरीता वापरता येईल व शेतक-यांसाठी शाश्वत सिंचनाचि सोय होण्यास मदत होइल. त्या करिता सदर तलवाच्या संकल्पनामध्ये आवश्यक तांत्रिक बदल करण्यासाठी मा. जिल्हा जलसंधारण अधिकारी जि.प.ल.पा. विभाग अहमदनगर यांचे नाहरकत घेणे आवश्यक असल्याचे उपविभागीय जलसं. अधिकारी मृ व जलसं. उपविभाग कोपरगाव यांनी कळविलेले आहे. त्या अनुषंगाने उक्त प्रस्ताव सक्षम स्तरावरून **ना हरकत प्रमाणपत्र** मिळणेकरिता जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसं. विभाग अहमदनगर यांनी उपरोक्त संदर्भ क्र. 5 अन्वये पुढील कार्यवाहीस्तव इकडे पाठविलेले आहे. उक्त प्रस्तावासोबत पाझर तलावांचे ठळक वैशिष्टये, स्थानिक लोकप्रतिनीधी यांचे पत्र, ग्राम पंचायत यांचेकडील पत्र/ ठराव यांची छायांकित प्रती व उक्त तलावाचे छायाचित्र सादर केलेले आहे.

**ठराव :-महाराष्ट्र** शासन मृद व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र. संकिर्ण- 2022/ प्र.क्र.101/ जल-1, दि. 13.04.2022 अन्वये पाझर तलावाचे रुपांतर साठवण तलावात करण्यापुर्वी विचारात घ्यावयाच्या 1 ते 18 मार्गदर्शक सुचना देण्यात आलेल्या आहेत. सदर सुचनांचे अनुपालन व पुर्तता मृद व जलसंधारण विभाग अहमदनगर यांनी करण्याच्या अटींच्या अधिन राहुन **पाझर तलाव वेस ता. कोपरगाव, पा. त. को-हाळे (कालेवाडी) व पा.त. पिंपरी लोकाई ता. राहाता तसेच पा.त. खांबे (नेहरवाडी) व पा.त. चंदनापुरी (तांबकडा) ता. संगमनेर** या जि.प. पाझर तलावाचे रुपांतर मृद व जलसंधारण विभागामार्फत

साठवण तलावामध्ये करण्याच्या कामांना ना हरकत देण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच **पाझर तलाव एरंडोली, ता. श्रीगोंदा** या जि.प. पाझर तलावाचे रुपांतरण मृद व जलसंधारण विभागामार्फत साठवण तलावामध्ये करण्याच्या कामाला कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

**विषय क्रमांक ५ :-मौजे पिंपळदरावाडी ता. अकोले जि. अहमदनगर येथील नवीन प्रकल्पाच्या जागी येणारा जिल्हा परिषदेचा जुना दगडी साठा बंधारा निर्लेखन करणेबाबत.**

**प्रस्तावना :-उपरोक्त** संदर्भिय विषयान्वये मौजे पिंपळदरावाडी ता. अकोले या गावामध्ये मोठा प्रकल्प होणेकामी ग्रामपंचायत/ ग्रामस्थ यांची आग्रहाची मागणी होती. ज्या ठिकाणी नवीन प्रकल्पाची मागणी करण्यात आली त्या ठिकाणी जिल्हा परिषद जलसंधारण या यंत्रणेचा जुना दगडी साठा बंधारा आहे. परंतु सदरील बंधारा जुना व नादुरुस्त असुन त्याचा पुर्ण क्षमतेने वापर होत नसल्याने त्याठिकाणी मोठ्या नवीन प्रकल्पाची मागणी करण्यात आली आहे.

त्यानुसार संकल्पन प्राप्त असुन अंदाज पत्रकास महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. तसेच सदर कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहे. तरी सदर जिल्हा परिषदेचा जुना दगडी साठा बंधारा निर्लेखन बाबत कार्यवाही होणेसाठी आपले स्तरावरुन ना हरकत प्रमाणपत्र मिळावे असे जिल्हा जलसंधारण अधिकारी मृद व जलसंधारण विभाग अहमदनगर यांनी उपरोक्त संदर्भ क्र. 1 अनव्ये इकडे कळविलेले आहे.

उपविभागीय जलसंधारण अधिकारी जि.प.ल.पा. उपविभाग अकोले यांना सदर बंधारा निर्लेखन करणेबाबत समक्ष पाहणी करुन निर्लेखन प्रस्ताव सादर करणेबाबत उपरोक्त संदर्भ क्र. 2 अन्वये कळविण्यात आले होते. उपविभागीय जलसंधारण अधिकारी यांनी दि. 23.10.2023 रोजी सदर बंधा-याची समक्ष पाहणी केली आहे. सदर बंधा-यामध्ये 100 टक्के पाणी साठा प्रत्यक्ष दिसुन आलेला आहे. बंधा-याची जिवंत साठवण क्षमता 0.09 द.ल.घ.मी. आहे. बंधा-याची 10 टक्के गळती दिसुन आलेली आहे असे उपविभागीय जलसं. अधिकारी यांनी उपरोक्त संदर्भ क्र. 3 अन्वये इकडे कळविलेले आहे.

सदर प्रस्तावित प्रकल्पामुळे पाणी साठ्यात होणारी वाढबाबत अतिरिक्त भुसंपदनाची तरतुद केलेली आहे का. व जुना साठा बंधारा निर्लेखन नाहरकत प्रमाणपत्रासाठी मा. प्रादेशिक

जलसंधारण अधिकारी यांच्या निरीक्षण टिपणीसह सविस्तर प्रस्ताव इकडे सादर करणेबाबत जिल्हा जलसंधारण अधिकारी मृद व जलसंधारण विभाग अहमदनगर यांना उपरोक्त संदर्भ क्र. 4 अन्वये कळविण्यात आलेले आहे.

मा. प्रादेशिक जलसंधारण अधिकारी मृवज. विभाग नाशिक यांनी सदर योजनेला दि. 19.11.2023 रोजी भेट दिलेली आहे. याबाबत मा. प्रादेशिक जलसंधारण अधिकारी यांना काही सुचना दिल्या आहेत. सदर सुचनांमधील काही सुचना खालील प्रमाणे आहे.

- सदर योजना ही आदिवासी बहुल भागातील आहे. ब-याच वर्षापासुनची मागणी असल्याने या योजनेचे काम या वर्षात पुर्ण होणे गरजेचे आहे. यासाठी बंधा-याचे खालील बाजुस 10 ते 15 मी. अंतरावर योजनेचे काम करणेत यावे.
- यामुळे अस्तित्वातील बंधारा तोडणेसाठी लागणारा वेळही वाचेल व सदर बाबीसाठी होणारा खर्च ही बचत होईल. सद्यःस्थितीत बंधारा पाण्याने भरलेला असल्याने बंधारा रिकामा करुन काम करणे जिकीरीचे आहे.
- योजनेचे खालील भागातील बंधारे सुस्थितीत आहे का याची खातरजमा करावी.
- योजनेचे खालील बाजुस इतर जिल्हा मार्ग आहे व याच स्थानिक नाल्यावर मार्ग व पुल आहे. या मार्गास पर्यायी मार्ग नसल्याने मार्ग पुलास हानी पोहोचणार नाही याची काळजी घेणे गरजेचे आहे.

सरपंच, ग्रा.पं. पिंपळदरावाडी ता. अकोले यांचे मागणी निवेदन दि. 23.02.2024 व उपविभागीय जलसं. अधिकारी मृवज. उपविभाग संगमनेर यांनी दिलेला अहवाल दि. 26.02.2024 नुसार सदर मुळ बंधारा नादुरुस्त असुन बंधा-यात पाणी साठा शिल्लक नसल्याने आजमितीस क्षेत्रीय परिस्थीती विचारात घेता मागणी पुर्ततेसाठी सदर योजनेचे काम मंजुर अंदाजपत्रकातील नमुद ठिकाणी करणेबाबत परवानगी देण्यात येत आहे. त्यानुसार खालील मुद्यांच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी व योजनेचे काम तात्काळ हाती घेण्या बाबत जिल्हा जलसंधारण अधिकारी मृवज. विभाग यांना उपरोक्त संदर्भ क्र. 6 अन्वये मा. प्रादेशिक जलसंधारण अधिकारी मृवज. विभाग नाशिक यांनी निर्देश दिले आहे.

- योजनेचे काम जलदगतीने पुर्ण करुन पावसाळयातील पाणी साठा होण्याकरिता योजनेचे काम मुळ बंधा-याच्या जागीच घेण्यात यावे.
- योजनेचे भुसंपादन कार्यवाही तात्काळ हाती घेऊन पुर्ण करावी. याबाबत व्ही.सी. द्वारे दि. 08.02.2024 रोजी आवश्यक सुचना देण्यात आलेल्या आहेत. भुसंपादन कार्यवाही तात्काळ पुर्ण करुन योजनेचे काम विहीत कालावधीत पुर्ण करण्यासाठी कालबद्ध नियोजन करावे.

**नियमातील तरतूदी** -महाराष्ट्र शासन जलसंधारण विभागाकडील शा.नि. क्र. जलसं-2011/ प्र.क्र.127/ जल-7, दि. 03.07.2013.

**विभागाचा अभिप्राय -**

ग्रामपंचायत/ ग्रामस्थ मौजे पिंपळदरावाडी ता. अकोले यांनी गावामध्ये मोठा प्रकल्प होणेकामी आग्रहाची मागणी केलेली आहे. तसेच लोक प्रतिनिधी यांचे आग्रही मागणी करण्यात आलेली आहे. परंतु नवीन प्रकल्पासाठी जि.प. जुना दगडी साठा बंधारा आहे त्याच ठिकाणाची मागणी करण्यात आली आहे. शासन निर्णयानुसार सिमेंट नाला बांध या प्रकारच्या संधानकयुक्त प्रकल्पाचे आयुर्मान 23 वर्षे निश्चित केलेले आहे. सदरील बंधारा 1996 साली झाला असल्याने सद्यस्थितीत त्याचे आयुर्मान पुर्ण झालेले आहे.

मौजे पिंपळदरावाडी ता. अकोले येथील जि.प. दगडी साठा बंधारा जुना व जीर्ण झालेला आहे. हा अस्तित्वातील बंधारा पाडुन त्या जागी नवीन संधानकातील अधिक उंचीचा व अधिक पाणी संचय क्षमता असलेला ल.पा. तलाव बांधावयाचा आहे. प्रस्तावित प्रकल्प झाल्यास यातुन 960.05 स.घ.मी. इतका पाणीसाठा होणार आहे. व 249 हे. क्षेत्र सिंचना खाली आणणे प्रस्तावित आहे. त्यानुसार संकल्पन प्राप्त असुन अंदाज पत्रकास महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ अंतर्गत प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच सदर कामाचे कार्यारंभ आदेश जिल्हा जलसंधारण अधिकारी मृद व जलसंधारण विभाग अहमदनगर यांनी दिलेली आहे.

तरी सदर जिल्हा परिषदेचा जुना दगडी साठा बंधारा निर्लेखन करणे, नविन लघु पाटबंधारा तलावाचे बांधकाम करणे तसेच सदर प्रस्तावित तलवाच्या उंचीमुळे होणा-या जादाचे पाणी साठामुळे होणा-या अतिरिक्त भुसंपादनाची कार्यवाही जिल्हा जलसंधारण

अधिकारी मृद व जलसंधारण विभाग अहमदनगर यांचेमार्फत करण्याच्या अटीच्या व शासन निर्णयाच्या अधिन राहुन ना हरकत प्रमाणपत्र देण्यात यावे असे इकडील मत आहे. त्या अनुषंगाने सदरचा ठराव जि. प. सर्वसाधारण सभेत मान्यतेसाठी सादर करणेस्तव सादर करण्यात येत आहे.

**<u>ठराव क्रमांक १६१:-</u>** उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मौजे पिंपळदरावाडी ता. अकोले या गावामध्ये मोठा प्रकल्प होणेकामी ग्रामपंचायत/ ग्रामस्थ यांची आग्रहाची मागणी होती. ज्या ठिकाणी नवीन प्रकल्पाची मागणी करण्यात आली त्या ठिकाणी जिल्हा परिषद जलसंधारण या यंत्रणेचा जुना दगडी साठा बंधारा आहे. परंतु सदरील बंधारा जुना व नादुरुस्त असुन त्याचा पुर्ण क्षमतेने वापर होत नसल्याने त्याठिकाणी मोठ्या नवीन प्रकल्पाची मागणी करण्यात आली आहे.

त्यानुसार संकल्पन प्राप्त असुन अंदाज पत्रकास महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. तसेच सदर कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहे. तरी सदर जिल्हा परिषदेचा जुना दगडी साठा बंधारा निर्लेखन बाबत कार्यवाही होणेसाठी आपले स्तरावरुन ना हरकत प्रमाणपत्र मिळावे असे जिल्हा जलसंधारण अधिकारी मृद व जलसंधारण विभाग अहमदनगर यांनी उपरोक्त संदर्भ क्र. 1 अनव्ये इकडे कळविलेले आहे.

उपविभागीय जलसंधारण अधिकारी जि.प.ल.पा. उपविभाग अकोले यांना सदर बंधारा निर्लेखन करणेबाबत समक्ष पाहणी करुन निर्लेखन प्रस्ताव सादर करणेबाबत उपरोक्त संदर्भ क्र. 2 अन्वये कळविण्यात आले होते. उपविभागीय जलसंधारण अधिकारी यांनी दि. 23.10.2023 रोजी सदर बंधा-याची समक्ष पाहणी केली आहे. सदर बंधा-यामध्ये 100 टक्के पाणी साठा प्रत्यक्ष दिसुन आलेला आहे. बंधा-याची जिवंत साठवण क्षमता 0.09 द.ल.घ.मी. आहे. बंधा-याची 10 टक्के गळती दिसुन आलेली आहे असे उपविभागीय जलसं. अधिकारी यांनी उपरोक्त संदर्भ क्र. 3 अन्वये इकडे कळविलेले आहे.

सदर प्रस्तावित प्रकल्पामुळे पाणी साठ्यात होणारी वाढबाबत अतिरिक्त भुसंपदनाची तरतुद केलेली आहे का. व जुना साठा बंधारा निर्लेखन नाहरकत प्रमाणपत्रासाठी मा. प्रादेशिक जलसंधारण अधिकारी यांच्या निरीक्षण टिपणीसह सविस्तर प्रस्ताव इकडे सादर करणेबाबत

जिल्हा जलसंधारण अधिकारी मृद व जलसंधारण विभाग अहमदनगर यांना उपरोक्त संदर्भ क्र. 4 अन्वये कळविण्यात आलेले आहे.

मा. प्रादेशिक जलसंधारण अधिकारी मृवज. विभाग नाशिक यांनी सदर योजनेला दि. 19.11.2023 रोजी भेट दिलेली आहे. याबाबत मा. प्रादेशिक जलसंधारण अधिकारी यांना काही सुचना दिल्या आहेत. सदर सुचनांमधील काही सुचना खालील प्रमाणे आहे.

- सदर योजना ही आदिवासी बहुल भागातील आहे. ब-याच वर्षापासुनची मागणी असल्याने या योजनेचे काम या वर्षात पुर्ण होणे गरजेचे आहे. यासाठी बंधा-याचे खालील बाजुस 10 ते 15 मी. अंतरावर योजनेचे काम करणेत यावे.
- यामुळे अस्तित्वातील बंधारा तोडणेसाठी लागणारा वेळही वाचेल व सदर बाबीसाठी होणारा खर्च ही बचत होईल. सद्यःस्थितीत बंधारा पाण्याने भरलेला असल्याने बंधारा रिकामा करुन काम करणे जिकीरीचे आहे.
- योजनेचे खालील भागातील बंधारे सुस्थितीत आहे का याची खातरजमा करावी.
- योजनेचे खालील बाजुस इतर जिल्हा मार्ग आहे व याच स्थानिक नाल्यावर मार्ग व पुल आहे. या मार्गास पर्यायी मार्ग नसल्याने मार्ग पुलास हानी पोहोचणार नाही याची काळजी घेणे गरजेचे आहे.

सरपंच, ग्रा.पं. पिंपळदरावाडी ता. अकोले यांचे मागणी निवेदन दि. 23.02.2024 व उपविभागीय जलसं. अधिकारी मृवज. उपविभाग संगमनेर यांनी दिलेला अहवाल दि. 26.02.2024 नुसार सदर मुळ बंधारा नादुरुस्त असुन बंधा-यात पाणी साठा शिल्लक नसल्याने आजमितीस क्षेत्रीय परिस्थीती विचारात घेता मागणी पुर्ततेसाठी सदर योजनेचे काम मंजुर अंदाजपत्रकातील नमुद ठिकाणी करणेबाबत परवानगी देण्यात येत आहे. त्यानुसार खालील मुद्यांच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी व योजनेचे काम तात्काळ हाती घेण्या बाबत जिल्हा जलसंधारण अधिकारी मृवज. विभाग यांना उपरोक्त संदर्भ क्र. 6 अन्वये मा. प्रादेशिक जलसंधारण अधिकारी मृवज. विभाग नाशिक यांनी निर्देश दिले आहे.

- योजनेचे काम जलदगतीने पुर्ण करुन पावसाळयातील पाणी साठा होण्याकरिता योजनेचे काम मुळ बंधा-याच्या जागीच घेण्यात यावे.

- योजनेचे भुसंपादन कार्यवाही तात्काळ हाती घेऊन पुर्ण करावी. याबाबत व्ही.सी. द्वारे दि. 08.02.2024 रोजी आवश्यक सुचना देण्यात आलेल्या आहेत. भुसंपादन कार्यवाही तात्काळ पुर्ण करुन योजनेचे काम विहीत कालावधीत पुर्ण करण्यासाठी कालबद्ध नियोजन करावे.

**सदर** जिल्हा परिषदेचा मौजे पिंपळदरावाडी ता. अकोले येथील जुना दगडी साठा बंधारा निर्लेखन करणे, नविन लघु पाटबंधारा तलावाचे बांधकाम करणे तसेच सदर प्रस्तावित तलवाच्या उंचीमुळे होणा-या जादाचे पाणी साठामुळे होणा-या अतिरिक्त भुसंपादनाची कार्यवाही जिल्हा जलसंधारण अधिकारी मृद व जलसंधारण विभाग अहमदनगर यांचेमार्फ़त करण्याच्या अटीच्या व शासन निर्णयाच्या अधिन राहुन ना हरकत प्रमाणपत्र देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**विषय क्रं ६:-** मौजे विळद ता.जि.अहमदनगर येथील मालमत्ता क्रमांक 24 मधील सार्वजनिक जागा ग्रामपंचायत विकास कामासाठी देणेबाबत

संदर्भ:-1.जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम ,1961 मधील कलम 128,पोट कलम 1(ब)

2.महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्र.झेडपीए.1087/सीआर/2853/28 मंत्रालय मुंबई-32 दि.24 मार्च 1987

3.गटविकास अधिकारी पंचायत समिती नगर यांचेकडील पत्र ग्रापंवि/323/2024अहमदनगर दि.04/03/2024

मौजे.विळद ता.नगर जि.अहमदनगर येथील मिळकत क्र.24 मधील जिल्हा परिषद अहमदनगर यांचे मालकीची 34960 चौ.फुट एवढी बखळ जागा आहे पैकी ग्रामपंचायत कार्यालय इमारत बांधकामाकरीता 5 गुंठे जागा,प्राथमिक आरोग्य उपकेंद्र 7 गुंठे व बचतगट ग्रामसंघ भवन 2 गुंठे अशी एकुण 14 गुंठे जागेची ग्रामपंचायतीला आवश्यकता असलेबाबत उक्त संदर्भ क्र.3 अन्वये गटविकास अधिकारी पंचायत समिती नगर यांनी इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 मधील कलम 128 पोट कलम 1(ब) अन्वये जिल्हा परिषदेस आपल्या कार्यापैकी कोणत्याही कार्याच्या प्रयोजनासाठी तिच्यामध्ये निहित असलेली,किंवा निहित करता येईल अशी,किंवा ती संपादन

करील अशी कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता पट्टयाने देता येईल,विकता येईल अन्यथा ती हस्तांतरित येईल.परंतु अशा कोणत्याही मालमत्तांचे कोणतेही संपादन,भाडेपट्टा,विक्री किंवा हस्तांतरण हे नियमांव्दारे विहित करण्यात येईल अशा प्राधिका-याच्या किंवा अधिका-याच्या पूर्वमंजुरीवाचून विधिग्राहय असणार नाही. सदर नियमानूसार मौजे.विळद ता.नगर जि.अहमदनगर येथील मिळकत क्र.24 मधील जिल्हा परिषद अहमदनगर यांचे मालकीची 34960 चौ.फुट एवढी बखळ जागा ग्रामपंचायत विकास कामासाठी ग्रामपंचायत विळदकडे हस्तांतरीत करणेकामी संदर्भ क्र.1 व 2 अन्वये शासनास प्रस्ताव सादर करणेस सदयस्थितीत जिल्हा परिषद अहमदनगर यांचे विदयमान मा.अध्यक्ष /मा. उपाध्यक्ष/सदस्य यांचे कार्यकाळाची मुदत संपलेली असल्याने ग्रामविकास विभाग यांचेकडील दि.13 सप्टेंबर 2022 चे महाराष्ट्र शासन राजपत्रानुसार सध्या सर्व प्रशासकीय अधिकार हे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर यांना असल्याने प्राप्त अधिकारांनुसार जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस विनंती आहे.

**<u>ठराव क्रं १६२</u>**:- मौजे.विळद ता.नगर जि.अहमदनगर येथील मिळकत क्र.24 मधील जिल्हा परिषद अहमदनगर यांचे मालकीची 34960 चौ.फुट एवढी बखळ जागा आहे पैकी ग्रामपंचायत कार्यालय इमारत बांधकामाकरीता 5 गुंठे जागा,प्राथमिक आरोग्य उपकेंद्र 7 गुंठे व बचतगट ग्रामसंघ भवन 2 गुंठे अशी एकुण 14 गुंठे जागेची ग्रामपंचायतीला आवश्यकता असलेबाबत उक्त संदर्भ क्र.3 अन्वये गटविकास अधिकारी पंचायत समिती नगर यांनी इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 मधील कलम 128 पोट कलम 1(ब) अन्वये जिल्हा परिषदेस आपल्या कार्यापैकी कोणत्याही कार्याच्या प्रयोजनासाठी तिच्यामध्ये निहित असलेली,किंवा निहित करता येईल अशी,किंवा ती संपादन करील अशी कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता पट्टयाने देता येईल,विकता येईल अन्यथा ती हस्तांतरित येईल.परंतु अशा कोणत्याही मालमत्तांचे कोणतेही संपादन,भाडेपट्टा,विक्री किंवा हस्तांतरण हे नियमांव्दारे विहित करण्यात येईल अशा प्राधिका-याच्या किंवा अधिका-याच्या पूर्वमंजुरीवाचून विधिग्राहय असणार नाही. सदर नियमानूसार मौजे.विळद ता.नगर जि.अहमदनगर येथील मिळकत क्र.24 मधील जिल्हा परिषद अहमदनगर यांचे मालकीची 34960 चौ.फुट एवढी बखळ जागा ग्रामपंचायत विकास कामासाठी ग्रामपंचायत विळदकडे हस्तांतरीत करणेकामी संदर्भ क्र.1 व 2 अन्वये शासनास प्रस्ताव सादर करणेस सदयस्थितीत

जिल्हा परिषद अहमदनगर यांचे विदयमान मा.अध्यक्ष /मा. उपाध्यक्ष/मा.सदस्य यांचे कार्यकाळाची मुदत संपलेली असल्याने ग्रामविकास विभाग यांचेकडील दि.13 सप्टेंबर 2022 चे महाराष्ट्र शासन राजपत्रानुसार सध्या सर्व प्रशासकीय अधिकार हे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर यांना असल्याने प्राप्त अधिकारांनुसार सदर विषयास जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मान्यता देण्यात येत आहे.

**विषय क्रंमाक-७** :- **15 वा वित्त आयोग जिल्हा परिषद आराखडा (DPDP) सन 2024-25 आराखडा मंजुरीबाबत.**

**प्रस्तावना :- महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, यांचेकडील शासन निर्णय क्रं. बीपीडीपी-2021/प्र.क्र.21 / पंरा-6 दि. 01 नोव्हेंबर 2021 नुसार पंचायत समिती विकास आराखडा व जिल्हा परिषद विकास आराखडा (BPDP/DPDP) तयार करण्याबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सन 2024-25 या वर्षाचा 15 वा वित्त आयोग वार्षिक विकास आराखडा तयार करणे साठी जिल्हा परिषद नियोजन समिती समितीची सभा दि.29/02/2024 रोजी छत्रपती शिवाजी महाराज समिती सभागृह जिल्हा परिषद अहमदनगर येथे आयोजित करण्यात आली होती सदर सभेत दिलेल्या सूचनांनुसार विभाग प्रमुखांनी सादर केलेले आराखडे एकत्रिकरण समितीत एकत्रित करून छाननी समितीने छाननी केलेल्या आराखडयास जिल्हा परिषद नियोजन समितीची मान्यता घेऊन जिल्हा परिषद विकास आराखडा सन 2024-25 अंतिम करण्यात आला आहे. त्यास मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेऊन महाराष्ट्र शासनाच्या ई ग्राम स्वराज पोर्टलवर अपलोड करण्यात आला असून त्यास जिल्हा परिषद सर्वसाधरण सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.**

**नियमातील तरतूद :- महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, यांचेकडील शासन निर्णय क्रं. बीपीडीपी-2021/प्र.क्र.21 / पंरा-6 दि. 01 नोव्हेंबर 2021 मधिल मुद्दा क्र.2.19 मध्ये जिल्हा परिषद विकास आराखडयास जिल्हा परिषद छाननी केल्यानंतर जिल्हा परिषद विकास आराखडयास जिल्हा परिषद सर्वसाधरण सभा अंतिम मान्यता देईल असे नमूद केले आहे. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग यांचेकडील राजपत्र दि.13/09/2022 नुसार जिल्हा परिषद अहमदनगरचा कार्यकाल दि.20/03/2022 रोजी संपुष्टात आला असल्याने जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि विषय समितीचे सभापती यांची पदे एकाचवेळी रिक्त झाली आहेत त्यामुळे अहमदनगर जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समितींचे सभापती यांची पदे निवडणूकीव्दारे भरले जातील तोपर्यंत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जिल्हा परिषदेच्या सर्व अधिकारांचा वापर**

करण्यासाठी व त्यांची सर्व कर्त्यव्य पार पाडण्यासाठी प्रशासक म्हणून मुदतवाढ देण्यात आली आहे.

